Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Maharashtra, India
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जा.क्र.कबचौउमवि/२४/भौ.वि./२०२३/15 दि.०६/१२/२०२३

# दर मागणी पत्रक

प्रति,

-----------------------

-----------------------

------------------------

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील (भौतिकशास्त्र प्रशाळा विभागाचे नाव :- भौतिकशास्त्र विभाग) विभागासाठी खालील तक्त्यात नमूद विविध वस्तुंच्या खरेदीसाठी सीलबंद दरपत्रके सादर करण्यास इच्छुक असलेल्या पुरवठादारांकडून दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | साहित्याचा तपशील | तांत्रिक स्पेसीफिकेशन्स अत्यावश्यक | संख्या | दर (सर्व करांसह) | एकूण रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Gauss and Tesla Meter with measuring probe | Microcontroller Based LCD Display for Measurement of Magnetic Field in Gauss and Tesla, with PC Interface facility. Sensor : InAs for better sensitivity, Range: 0-20kG, Special Feature : Indicate the direction of the magnetic field, Mains : 230V AC± 10%, 50Hz | 2 | Rs. 21,200/- | **Rs. 42,400/--** |

(दरपत्रक सादर करतांना रकाना क्र.3 वरील अत्यावश्यक तांत्रिक स्पेसीफिकेशन्स हेच तुलनात्मक दरांसाठी ग्राहय धरले जातील)

दरपत्रके सादर करण्यासाठी आवश्यक असलेल्या अटी व शर्ती:-

1. खरेदीची अंदाजित रक्कम रू.42,400/- आहे.
2. विद्यापीठात खरेदी करावयाचे साहित्य हे विद्यापीठात प्रत्यक्ष पोहोच करून, फिटींग करून द्यावयाचे आहे.
3. दर सादर करतांना भाडे, पॅकिंग, फिटींग तसेच इतर प्रासंगिक खर्च विचारात घेऊन दर सादर करावेत. एकापेक्षा जास्त मेक आणि मॉडेल साठी किंमती द्यावयाच्या असल्यास वेगवेगळया द्याव्यात. तसेच Warranty/Guarantee नमूद करून त्याचे कार्ड मालाच्या पुरवठयासोबत जोडणे आवश्यक आहे.
4. आवश्यकता भासल्यास पुरवठादारांना प्रत्यक्ष जागेची/विद्यापीठात उपलब्ध नमुन्याची पाहणी करता येईल. आवश्यक असेल तेथे पडताळणीसाठी नमुना (sample) जोडावा लागेल.
5. दरपत्रकात मागणी केलेल्य साहित्यातील संख्या कमी/अधिक करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.
6. दरमागणी पत्रातील तपशीलात बदल करण्याचा, रद्द करण्याचा, दुरूस्ती करण्याचा, तसेच आलेले दरपत्रक नाकारण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.
7. अग्रीम स्वरूपात कुठलीही रक्कम मिळणार नाही. तसेच सशर्त दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.
8. पुरवठादाराने पॅन कार्ड, उद्यम/शॉप ॲक्ट नोंदणीपत्र तसेच GST प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. GST मध्ये नोंदणी नसल्यास, त्याचे कारणासहित घोषणापत्र (Declaration) द्यावे.
9. देयके सादर करतांना विद्यापीठाचा GST No.27AAAJN0465A1ZL चा उल्लेख करून पक्के बिल द्यावे लागेल. GST शासकीय खात्यात भरणा करीत असल्याचा पुरावा म्हणून मागील महिन्याचा GSTR-3B सोबत नियमितता पाहूनच बिलाची

10. साहित्याच्या /सेवेच्या गुणवत्तेमध्ये फरक आढळल्यास बिलाची अदायगी करण्यात येणार नाही.

11. खरेदी आदेश / कार्यादेश दिल्यानंतर पुरवठादाराने वस्तू/सेवेचा विहित कालावधीत पुरवठा केला नाही, तर सदर वस्तु/सेवा व्दितीय क्रमांकाने किमान दर सादर करणा-या पुरवठादारांकडून खरेदी करण्यात येईल. अश्या परिस्थितीत विद्यापीठाला आर्थिक नुकसान सहन करावे लागल्यास त्याची नुकसान भरपाई आपणाकडून करून घेण्यात येईल. तसेच आपल्या आस्थापनेचे नाव पुरवठादारांच्या काळया यादीत टाकण्यात येईल.

12. संबंधित विभागाकडून वस्तू/सेवा समाधानकारक मिळाल्याचा अहवाल वित्त विभागास सादर झाल्यानंतर 7 दिवसाच्या आत बिल अदायगी करण्यात येईल. आवश्यक असेल तेथे शासकीय कर कपात करण्यात येईल.

13. सदरचे सीलबंद दरपत्राक हे पुरवठादाराच्या लेटरहेडवर सही व शिक्क्यानिशी सर्व करांसह दर नमूद करून विभागप्रमुख, भौतिकशास्त्र विभाग यांचे नावे भौतिकशास्त्र विभाग, भौतिकशास्त्र प्रशाळा, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचे कार्यालयात दि.15/12/2023 रोजी किंवा तत्पूर्वी कार्यालयीन वेळेत सादर करावे.

14. दर मागणी पत्रकात काही बदल झाल्यास अथवा वेळेत वाढ दिल्यास त्याची सूचना ही शुध्दिपत्रक म्हणून विद्यापीठाचे पोर्टल www.nmu.ac.in वर प्रसिध्द करण्यात येईल. त्यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

15. प्राप्त दरपत्रकांतून केवळ किमान दर नमूद केलेल्या पुरवठादाराशीच संपर्क करण्यात येईल. त्यामुळे दर नमूद करतांना अवास्तव दर नमूद करू नयेत.

16. दरपत्रकासंदर्भात अतिरिक्त माहितीसाठी डॉ.पी.जी.चव्हाण मो.नं.______ ऑफीस नं.0257-2257474 वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

17. पुरवठादाराने सदरचा नमुना आपल्या सही शिक्क्यानिशी आपण सादर करीत असणा-या दरपत्रकासोबत उपरोक्त अटी व शर्ती मान्य आहेत या करिता जोडून पाठवणे आवश्यक आहे.

विभागप्रमुख
भौतिकशास्त्र विभाग

Head,
Department of Physics,
School of Physical Sciences
Kavayitri Bahinabai Chaudhari
North Maharashtra University
JALGAON - 425001 (M.S)

मला / आम्हाला उपरोक्त अटी व शर्ती मान्य आहेत.

पुरवठादाराची सही व शिक्का

मो.नं.